# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

(सायंकाळ)

**दिनांक ०७.०७.२०२६ मंगळवार**

**मा. न्यायालयातुन आरोपीला सश्रम कारावासाची शिक्षा :–**

दिनांक ०७.०७.२०२६ रोजी मा. अति. जिल्हा व सत्र न्यायाधीश–१४, नागपुर, श्री. ब्रम्हानंद एम. धानुरे साहेब यांनी त्यांचे कोर्टाचे केस क्र. ९५/२०२३ मधील, पोलीस ठाणे वाडी येथील अप. क्र. ५६८/२०२१ कलम ३०७,५०४,५०६ भा.दं.वि. या गुन्ह्यातील आरोपी नामे राजेश गोपाल मोहाड, वय ३३ वर्षे, रा. न्यु म्हाडा कॉलोनी डवलामेटी, वाडी, नागपूर याचे विरूध्द साक्षी पुराव्याअंती गुन्हा शाबीत झाल्याने, **आरोपीस कलम ३०७ भा.दं.वि. कायद्यान्वये ०५ वर्षे सश्रम कारावासाची शिक्षा व ५००/– रू. दंड आणि दंड न भरल्यास ०३ महिणे अतिरीक्त सश्रम कारावासाची शिक्षा ठोठावली.**

दिनांक १२.१२.२०२१ चे १९.३० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे वाडी हद्दीत, आंबेडकर नगर, गोपाल हिरणवार यांचे गोडावुन समोर फिर्यादीचा भाचा नामे रजत मनराज तुट वय २६ वर्षे, रा. आंबेडकर नगर, रमाबाई चौक, वाडी, नागपूर ह्याचा परिचीत वर नमुद आरोपी याने पैशाचे जुन्या भांडणाचे कारणावरून फिर्यादीचे भाचाला जिवे ठार मारण्याच्या उद्देशाने, त्याचे जवळील धारदार चाकूने छातीवर, मांडीवर तसेच, गुप्तांगाजवळ मारून गंभीर जखमी केले. गंभीर जखमीचा उपचार वेलट्रीट हॉस्पीटल येथे करण्यात आला. अशा फिर्यादी प्रकाश बाबूराव मेंढे वय ४४ वर्षे, रा. आंबेडकर नगर, वाडी, नागपूर यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे वाडी येथे आरोपीविरूध्द गुन्हा नोंदविण्यात आला होता. आरोपीस दिनांक १३.१२.२०२१ रोजी अटक करण्यात आली होती.

गुन्ह्याचे तपासी अधिकारी तत्कालीन सपोनि. श्री. गणेश फुलकवर साहेब यांनी मा. कोर्टात तपासाअंती दोषारोपपत्र सादर केले होते. सदर खटल्यात सरकारी अभियोक्ता म्हणून ॲड. श्रीमती दिपाली गणगणे यांनी तर, आरोपीतर्फे ॲड. श्री. पराग उके साहेब यांनी काम पाहिले. सदर गुन्ह्यात कोर्ट पैरवी अधिकारी पोहवा. अनिल पोतराजे यांनी काम पाहिले.

**(कामगिरी)**

**यशोधरानगर पोलीसांची कामगिरी :– जुगार खेळणाऱ्या आरोपींविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक ०७.०७.२०२६ चे ०२.५५ वा. चे सुमारास, पोलीस ठाणे यशोधरानगर येथील तपास पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी मिळालेल्या खात्रीशीर माहितीवरून, पोलीस ठाणे हद्दीत भिलगाव ते रनाळा रोडवरील नहरचे बाजुला सार्वजनिक ठिकाणी मोकळ्या जागेत पंचासमक्ष रेड कारवाई केली असता, त्याठिकाणी आरोपी क्र. १) अभिजीत सुनिल कांबळे वय ३४ वर्षे रा. प्लॉट क्र. ०८, कामनानगर, कळमणा, नागपूर २) अनिल घनश्याम डेसलहरे वय ३२ वर्षे, प्लॉट क्र. ११२, विजयनगर, कळमणा, नागपुर ३) मोहम्मद इरफान मोहम्मद जाहीद वय २८ वर्षे रा. नवी वस्ती, टेका, पाचपावली, नागपूर ४) अभिषेक मनोज लाटणवार वय २३ वर्षे, रा. कामगारनगर, कामठी नागपुर ५) आशिष किशोर मनपिया वय ३० वर्षे, रा. सानिका विहार

डुप्लेक्स, भिलगाव, नागपुर हे समक्ष ताश पत्यावर पैश्याची बाजी लावुन हार—जीतचा जुगार खेळतांना मिळुन आले. आरोपींचे ताब्यातुन रोख ३,२५०/—रू., ०३ मोबाईल फोन, ताश पत्ते व ईतर साहित्य असा एकुण २८,२५०/— रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपींविरूध्द पोलीस ठाणे यशोधरानगर येथे कलम १२ महा. जुगार प्रतिबंधक अधिनीयम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. नित्यानंद झा, पोलीस उप आयुक्त (परि. क्र. ५), मा. श्री. रोहीत ओव्हाळ सहा. पोलीस आयुक्त (कळमना विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली, वपोनि. युनुस चांद शेख, पोउपनि वैभव नागे, पोहवा राहुल बोंद्रे, पोअं. संदीप वानखेडे, क्षितेश चौरसिया यांनी केली.

**(गुन्हे)**

**१) पोलीस ठाणे नंदनवन :— चोरी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक ०७.०७.२०२६ चे ०२.३० वा. ते ०४.३० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे नंदनवन हद्दीत प्लॉट क्र. ११५, न्यु डायमंड नगर, साईमंदीरजवळ, खरबी रोड, नागपूर येथे राहणारे फिर्यादी संदीप बापुरावजी केचे वय ५० वर्ष यांचे घरी पुतणीचे हळदीचा कार्यक्रम असल्याने, रात्री कार्यक्रम आटोपल्यावर त्यांचे पत्नीने घातलेले सोन्याचे दागिने व रोख २२,०००/— रु. असा मुद्येमाल आलमारीत ठेऊन झोपी गेले असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे घराचे आंत प्रवेश करून, बेडरूममधील आलमारीतील रोख तसेच, सोन्याचे वेगवेगळे दागिने असा एकुण किंमती ३,२२,०००/—रू. चा मुद्देमाल चोरून नेला.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे नंदनवन येथे पोउपनि. बोरकर ९६३७६३२१२८ यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**२) पोलीस ठाणे मानकापूर :— घातक शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीस अटक.**

दिनांक ०७.०७.२०२६ चे १३.५० वा. चे सुमारास, मानकापूर पोलीसांचे पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, शफीनगर पुलाजवळ, दावत लॉनसमोर, मानकापूर रिंग रोड येथे एक संशयीत इसम पोलीसांना पाहुन पळु लागला. त्यास पाठलाग करून ताब्यात घेतले. पंचासमक्ष त्यास त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव वंश महादेव मेश्राम वय १९ वर्षे रा. भिमचौक, मिसाळ ले आऊट, मोठा इंदोरा, जरीपटका, नागपूर असे सांगीतले. आरोपीची अंगझडती घेतली असता, त्याचे ताब्यात लोखंडी सत्तुर मिळून आल्याने लोखंडी सत्तुर कि. अंदाजे १००/— रू. चा जप्त करण्यात आला.

आरोपी हा दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने चाकु घेवुन धुमधाम करतांना समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोलीस ठाणे मानकापूर येथे आरोपीविरूध्द कलम ४,२५ भा.ह.का., सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

**स्वा/—**

**( अंकुश राठोड )**
**पोलीस उप निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**

# वाहतुक शाखेची प्रेसनोट

हजरत बाबा ताजुद्दीन यांचा १०४ वा वार्षीक उर्स दिनांक ०८.०७.२०२६ ते दिनांक १९.०७.२०२६ पर्यंत हजरत बाबा ताजुद्दीन दर्गा, ताजबाग, नागपूर शहर येथे उर्स साजरा करण्यात येत आहे. या उर्स मध्ये संपुर्ण भारतातुन मोठ्या प्रमाणात भाविक येतात. सर्व सामान्य जनतेच्या जीवितास धोका व गैरसोय होवू नये तसेच, ताजबाग परिसरात भाविकांना दर्शन घेण्यास अडचण होवु नये, गर्दीमुळे एखादी अप्रिय घटना घडु नये करीता, परिसरात सर्व वाहनांना उर्सच्या कालावधीत बाबा ताजुद्दीन दर्गा परिसराचे चारही दिशेनी १०० मिटर अंतराच्या परिसरात प्रवेश बंदी व पार्कींग करीता मनाई घालण्याकरीता अधिसूचना काढणे आवश्यक आहे. त्यान्वये माझी अशी खात्री झाली आहे की, वाहतूकीस अडथळा निर्माण होवू नये, वाहतूक सुरळीत राहावी, सर्व सामान्य जनतेच्या जिवीतास धोका व गैरसोय होवू नये, म्हणुन खालील प्रमाणे वाहतूकीवर निर्बंध घालण्याकरीता सर्व वाहनांना **प्रवेश बंदी** व **नो–पार्कींग झोन** घोषित करणेबाबत खालील अधिसुचना निर्गमित करण्यात आलेली आहे.

**हजरत बाबा ताजुद्दीन यांच्या उर्स निमीत्य ताजबाग परिसराचे चारही दिशेनी सर्व वाहनांना १०० मिटर परिसरात वाहनास प्रवेश बंदी व वाहने पार्कींग करीता मनाई करण्यात येत आहे.**

**शितला माता मंदीर ते चामट चक्की चौक पर्यंतचा दोन्ही बाजुचा रोड वाहतुकी करिता बंद करण्यात येत असून, दिघोरी चौक कडुन येणारी वाहतूक ओंकार लॉन समोरील कटिंगवरून रमना मारूती नगर ते ईश्वर नगर चौक मार्गे वळविण्यात येत आहे. तसेच, शितला माता मंदीर चौकाकडुन वाहतूक हसनबाग ते खरबी चौक मार्गे वळविण्यात येत आहे.**

**सदर अधिसुचना दिनांक ०८.०७.२०२६ ते दिनांक १९.०७.२०२६ रोजी उर्स संपेपर्यत अंमलात राहील.**

तरी, वरील अधिसूचनेतील आदेश निर्देशाचे पालन करून पोलीस विभागास सहकार्य करावे.

**स्वा/–**
**( आदित्य मिरखेलकर, भापोसे )**
पोलीस उप आयुक्त, वाहतूक,
नागपूर शहर.